# कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा

## विद्यार्थी विकास कक्ष

### कौशल्य विकास कार्यशाळेचा (Soft Skill Development Workshop) अहवाल

विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने कौशल्य विकास योजने अंतर्गत (Soft Skill Development) हा विद्यापिठीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळा दिनांक ०३–०२–२०२० ते ०६–०२–२०२० ला चार दिवशीय कार्यशाळा घेण्यात आली. त्या कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी अध्यक्षीय स्थानी आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ व्ही. आर. पाटील होते. त्यांनी रितसर उदघाटन झाल्याचे जाहिर करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी प्रमुख अतिथी डॉ आर. सी. मग्गीरवार मॅडम होत्या. कार्यक्रमाचे विद्यार्थी विकास कक्षाचे प्रमुख प्रा डॉ गजेन्द्र बी. ढवळे यांनी प्रास्ताविक केले. तर आभार प्रदर्शन प्रा. क्षितीज शहा यांनी केले.

त्यानंतर कार्यशाळेला सुरुवात झाली. विद्यापिठाने प्रशिक्षित केलेल्या, प्रशिक्षकांना आमंत्रीत करण्यात आले होते. दिनांक ०३/०२/२०२० ला डॉ मग्गीरवार मॅडम, यांनी दोन सत्रात व्याख्यान दिले. दिनांक ०४/०२/२०२० ला प्रा. के एन. शहा, यांनी दोन सत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दिनांक ०५/०२/२०२० ला डॉ. वाय. आर. वैद्य, यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकरीता दोन सत्र घेतले. दिनांक ०६/०२/२०२० ला एम. आर. अडगोकर यांनी दोन सत्रात विद्यार्थ्यांना आपला विकास कसा करायचा याचे धडे दिले.

कार्यशाळेत बी.ए. भाग ३, बी.एस्सी. भाग ३ व बी. कॉम. भाग ३च्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्यात आले. या कार्यशाळेत ३२ विद्यार्थी १६ विद्यार्थीनी अशा एकूण ४८ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. प्रशिक्षकांनी व्यक्तीमत्व विकास तसेच विविध विषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. या चार दिवसात विद्यार्थ्यांनी संपूर्ण वर्गाच्या तासिका पूर्ण केल्या. अशा प्रकारे (Soft Skill Development) हा कार्यक्रम पूर्णपणे यशस्वी केला.

समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष आपल्या माहाविद्यालयाचे प्रचार्य डॉ. व्ही. आर. पाटील यांनी भुषविले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगिन विकास कसा घडून येतो. व आपले महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या विकासाकरीता कसे कार्य करते हे तपसिलवार विद्यार्थ्यांना सांगितले. तर डॉ गजेन्द्र ढवळे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रमाणप्रत्राचे महत्व स्पष्ट करून कार्यक्रमाच्या चार दिवसाचा आढावा घेत अहवाल वाचन केले. आभार प्रदर्शन प्रा. क्षितीज एन. शहा यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वीते करीता, महाविद्यालयचे प्राचार्य, डॉ व्ही. आर. पाटील तसेच प्राध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

संपूर्ण अहवाल विद्यापिठाकडे पाठविण्यात आला. विद्यापिठाकडून विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. त्याचे वाटप करण्याचे कार्य चालू आहे.